औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद

# सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे बाबत.

## संक्षिप्त जाहिरात

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ नुसार आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका हे १) मालमत्ता कर आकारणी/पाणीपटटी कर विषयक कामा करीता सेवानिवृत्त वर्ग-१ व वर्ग-२ दर्जाचे अधिकारी यांच्या सेवा करारपध्दतीने घेणे करीता पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. संबंधीत अधिकाऱ्यांनी दिनांक 11 /3/२०२२ रोजी सकाळी/~~सायंकाळी~~ 11:00 वाजता लेखी अर्ज व आवश्यक कागदपत्रासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, आमखास मैदाना जवळ महानगरपालिका औरंगाबाद येथे उपस्थित रहावे. उपरोक्त नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येईल. अर्जाचा नमुना, इतर तपशिल व अटी/शर्ती www.aurangabadmahapalika.org या औरंगाबाद महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर पी.डी.एफ.स्वरूपात उपलब्ध आहे.

**प्रशासक**
**महानगरपालिका, औरंगाबाद.**

ठिकाण:औरंगाबाद
दिनांक: 8/03/२०२२

Scanned with CamScanner

औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे बाबत.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर २०१६ नुसार आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका हे खाली नमुद केलेल्या विवक्षित कामाकरिता सेवानिवृत्त वर्ग-१ व वर्ग-२ दर्जाचे अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरीता पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून अर्ज मागविण्यात येत आहे.संबंधीत अधिकाऱ्यांनी दिनांक ११/०३/२०२२ रोजी सकाळी/~~संध्याकाळ~~ ११.०० वाजता लेखी अर्ज व आवश्यक कागदपत्रासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, आमखास मैदाना जवळ महानगरपालिका औरंगाबाद येथे हजर रहावे. उपरोक्त नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येईल. अर्जाचा नमुना, इतर तपशिल व अटी/शर्ती www.aurangabadmahapalika.org संकेतस्थळावर पी.डी.एफ.स्वरूपात उपलब्ध आहे.

### प्रस्तावना

औरंगाबाद महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी विभागा मार्फत शहराचे ड्रोन सर्वे करण्यात आला आहे. याव्दारे शहरातील सर्व इमारतींची GIS MAPPING करण्यात आले आहे. तसेच याच प्रकल्पा अंतर्गत सर्वेक्षकांव्दारे प्रत्येक घरी जावून सर्वेक्षण करण्यात येत असून विहीत नमुन्यात मालमत्ता कराची व पाणीपट्टीची माहिती संकलनाची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. याव्दारे संकलीत माहीतीनुसार जुन्या मालमत्ताधारकांना सुधारीत बांधकाम केले असल्यास त्यास फेर आकारणी करणे व ज्या मालमत्तांना कर आकारणी करण्यात आलेली नाही अशा मालमत्तांना नविन कर आकारणी करण्यात येणार आहे.

महानगरपालिकेच्या वॉर्ड कार्यालयातील कर विषयक काम पाहणाऱ्या तांत्रिक / अतांत्रिक कर्मचाऱ्यांकडून सदरचे काम करून घेण्याचे प्रस्तावित आहे सर्वेक्षणानसुार प्राप्त करण्यात आलेल्य माहितीची छाननी करण्यात येणार आहे. प्राप्त माहिती नुसार व आवश्यकते नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ मधील नियम ८ ते २० नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | विवक्षित कामाचे स्वरुप | पदांची संख्या | अर्हता | प्राधान्य |
|---|---|---|---|---|
| १ | **(Special Deputy Tax Officer)** **विशेष उप कर अधिकारी** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ८ नुसार उपआयुक्त (मालमत्ता कर) यांच्या स्तरावरील मालमत्ता कर आणि पाणीपटटी निर्धारण अंतीम करणे करीता समन्वयक/सहाय्यक व इतर अनुषंगिक कार्य | ०१ | शासनाच्या कर संबंधी काम केल्याचा शासन / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य सेवेतील समकक्ष पदाचा किमान 3 वर्षाचा अनुभव | वर्ग-1 चे निवृत्त अधिकारी IRS /आयकर विभाग/ वस्तु आणि सेवाकर विभाग कार्यालय, कस्टम विभाग ईत्यादी |

Scanned with CamScanner

औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ८ नुसार सहा.आयुक्त वॉर्ड कार्यालय यांच्या स्तरावरील मालमत्ता कर आणि पाणीपटटी निर्धारण अंतीम करणे करीता समन्वयक/सहाय्यक | ०९ | कर संबंधी काम केल्याचा शासन / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य सेवेतील समकक्ष पदाचा किमान 5 वर्षाचा अनुभव | वर्ग-2 चे निवृत्त अधिकारी आयकर विभाग/वस्तु आणि सेवाकर विभाग, कस्टम विभाग ईत्यादी |

सर्व साधारण अटी :-

१) उपरोक्त नमूद विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा वर नमुद केल्या प्रमाणे किमान वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात येत आहे. (अर्जा सोबत अनुभव प्रमाणपत्र अथवा सदर पदावरील आदेश व कार्यकाळ)

२) विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यात येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त ६ महिने कालावधी साठी देण्यात येईल. परंतू नियुक्तीस वाढीव कालावधीकरिता मुदतवाढ द्यायचे झाल्यास अतिरिक्त ६ महिने नुतनीकरण करता येईल.

३) सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांना सेवा निवृत्ती पूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन(महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह ) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल तसेच वाहन भात्ता व एच.आर.ए.देण्यात येईल.

४) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

५) करार पध्दतीने नियुक्ती करताना कमाल वयोमर्यादा ही ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावी.

६) असा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

७) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल. तसेच इतर बंधपत्रात/ हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देताना शसनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व

Scanned with CamScanner

उमेदवारांकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात उमेदवारांकडुन नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही. यांचा समावेश करुन सदर अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेख करण्यात यावा.

८) अशा अधिकारी/ कर्मचा-याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किवा प्रस्तावित नसलेबाबत संबंधित विभागाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक. किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

९) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०) असा अधिकारी/कर्मचारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल. अशा कोणत्याही व्वसायिक कामात गुंतलेला नसावा.

११) अशा अधिकारी/कर्मचारी यांनी conflict of interest जाहिर करणे आवश्यक राहील.

१२) अशा अधिकारी/कर्मचारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्याच्या निवृत्तीच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ते व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१३) अशा करार पध्दतीवरील अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्री बाबत गोपनीयात पाळणे आवश्यक राहील.

१४)नियुक्ती अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेरुन कामाचे मुल्यमापन करतील.

ठिकाण :- औरंगाबाद
दिनांक :- / /२०२२.

प्रशासक
महानगरपालिका औरंगाबाद

Scanned with CamScanner

औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद

अर्जाचा नमुना

प्रति,
**मा.आयुक्त,**
महानगरपालिका औरंगाबाद.

**विषय :-** सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.

**महोदय,**

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंती पुर्वक अर्ज करतो/करते की, मी शासन निर्णय दि. / /२०२२ मधील अटी व शर्ती पुर्ण करीत असून वरील विषयात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम करण्यास इच्छुक असून माझी खाली नमूद केल्यानुसार माहिती सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांचे पुर्ण नाव | |
| २. | पत्रव्यवहाराचा पत्ता/ संपर्क दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक/email id | |
| ३. | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व विभाग | |
| ४. | शासकीय सेवेत आल्याचा दिनांक/शासकीय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्ती पर्यंत धारण कलेली पदे व कार्यालय | |
| ५. | सेवा निवृत्तीचा दिनांक | |
| ६. | अर्जाच्या दिनांकास पुर्ण वय | |
| ७. | सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र) | |
| ८. | अर्जदार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसलेबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र | |
| ९. | विवक्षित कामाच्या अनुषंगाने प्रवास करावा लागल्यास तसे हमी पत्र सोबत जोडणे आवश्यक | |
| १०. | सद्यस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन (संबंधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |

स्थळ :-
दिनांक :-

स्वाक्षरी
(पूर्ण नांव)

Scanned with CamScanner